# यज्ञ विज्ञान

- सौ. प्रिया दाभाडे

आजच्या आधुनिक युगात मनुष्य सतत सुखाच्या शोधात असतो. त्याच्या ह्या प्रयत्नात त्याला सुख मिळतंही, पण ते शाश्वत नसल्याने त्याला थोडक्यातच समाधान मानावं लागतं. मग सुखाच्या शोधार्थ तो पुन्हा अनेक मार्ग अवलंबतो. सुखाचा पाठलाग करताना प्रत्यक्षात मात्र त्याची **'काखेत कळसा आणि गावाला वळसा'** अशी स्थिती झालेली आहे. कारण शाश्वत सुख, आत्मोन्नती आणि समाजोद्धार या तिन्ही पातळींवरील स्थैर्यासाठी आपल्या पूर्वजांनी, ऋषी-मुनींनी ज्या यज्ञमार्गाचा अवलंब केला, त्याचा मनुष्याला आज विसर पडला आहे. त्याकाळी अवलंबण्यात आलेल्या यज्ञसाधनेचे सुनिश्चित परिणाम होऊन वातावरणात प्रचंड ऊर्जा, शक्ती आणि सकारात्मक लहरी उत्पन्न होत असत. ज्या द्वारे व्यक्तिगत इच्छापूर्ती आणि समाजाचे एकत्रीकरण दोन्ही साध्य होत असे. ज्या अर्थी यज्ञमार्ग हे साधन त्यावेळी एवढे प्रभावी ठरले त्याअर्थी त्याचे ज्ञानपूर्वक व पूर्वग्रहदूषित दृष्टीकोनाशिवाय आचरण घडले, तर ते आजही तितक्याच क्षमतेने प्रभाव पाडू शकते हे निश्चित. पण आजच्या युगात जिथे फक्त विज्ञानाचा उदो उदो होतो आणि अंधश्रध्दा व कर्मकांड यामध्ये देखील काही वेळेला गल्लत होते, तिथे सतत सुखाच्या शोधात असलेलं मानवी मन गतकालीन यज्ञसाधनेकडे वळायला सहसा धजत नाही. अशावेळी विज्ञान व अध्यात्म यांची उत्तम सांगड घालून यज्ञामागील तत्त्वज्ञान कोणीतरी समजावून देण्याची गरज असते व आजच्या काळातली ही गरज ओळखूनच 'यज्ञ' या संकल्पनेवर श्री सद्‌गुरू बापट गुरुजींनी आपल्या 'यज्ञरहस्य' या पुस्तकाद्वारे यज्ञसाधनेबाबत अमूल्य मार्गदर्शन केले आहे.

'यज्ञ' हा विषय तात्त्विक सिध्दांतांबरोबरच वैज्ञानिक निष्कर्षांचे दाखले देऊन मांडलेला आहे. प्रकाशशक्ती, त्यावरील ध्यान, एकाग्रता व ध्वनीसामर्थ्यासहित मंत्रविज्ञान, त्याबाबतचे वैज्ञानिक प्रयोग, आणि समगती स्पंदन यांची उकल करून देताना विज्ञानातील मेंदुलहरींबाबतचा सिध्दांत, सूक्ष्म-अतिसूक्ष्म कणांशी निगडीत असलेला ईपीआर चा परस्परविरोध, आईनस्टाईनचे ऊर्जा, वस्तुमान आणि प्रकाशाच्या गतीचे प्रमेय या आणि अशा अनके वैज्ञानिक सिध्दांताचा आधार घेऊन, सामान्यजनांना अज्ञात असलेली यज्ञसाधनेतील वैज्ञानिक व तात्त्विक रहस्ये श्री बापट गुरुजींनी अचूक व नेमक्या शब्दांत मांडली आहेत.

वस्तुतः आपणही जेवणापूर्वी अन्नदेवतेला स्मरून उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' असे जेव्हा म्हणतो, तेव्हा भोजनरूपी हविर्भाग स्वतःतील जठराग्नीला अर्पण करीत असतो. या आहुतीवरच आपलं पुढील आयुष्य अवलंबून आहे, हे भौतिक सत्य आपल्याला माहित असतं. तसंच यज्ञामध्ये देखील उत्तम संदेशवाहक असलेल्या प्रकाशाला साक्षी ठेवून त्याच्याच माध्यमातून ईश्वरीशक्तीला हविर्भाग अर्पण केला व 'इदं न मम' म्हणत त्यागवृत्तीची जोड त्याला दिली, तर पारमार्थिकदृष्टया स्वकल्याण व पर्यायाने विश्वकल्याणही उत्तमरित्या साधले जाईल, ही यज्ञसाधनेची मध्यवर्ती संकल्पना आहे. एकत्रित यज्ञसाधनेमध्ये व्यक्तिसंख्येनुसार शक्तीची बेरीज न होता शक्तीचा गुणाकार होतो, म्हणूनच सामुहिक यज्ञसाधनेला अधिक महत्व आहे. असे असले तरीही वैयक्तिक साधना सोडून देऊन यज्ञकर्म करणे अपेक्षित नसून दोन्ही एकमेकांना पूरक असावेत असा व्यापक विचार आहे. विषय वैशिष्ट्यामुळे, तसेच श्री बापट गुरुजींची विषय मांडण्याची हातोटी व त्यांचे शब्द सामर्थ्य यांमुळे हे पुस्तक अत्यंत वाचनीय आणि तेवढेच संस्कारक्षम व संग्राह्य झाले आहे.

**- यज्ञरहस्य या पुस्तकाचे लेखक**

**प.पू. सद्‌गुरू श्री वासुदेव वामन बापट गुरुजी**

**- अधिक माहितीसाठी संपर्क -**

**अशोक सावंत मो. ९८६९१५७३०८,**

**मंगेश साखरे मो. ९९२३१८०८२१.**

www.yadnya.in या संकेत स्थळावर संपर्क



(अक्कलकोट स्वामिदर्शन मासिक - जानेवारी २०१२

• कव्हर डिझाईन व छपाई : मॉडर्न प्रिंटर्स (ऑफसेट),